भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८

**(सन १९०८ चा अधिनियम क्रमांक ६)**

[ १७ जून २०१६ रोजी यथाविद्यमान ]

# The Explosive Substances Act, 1908

**(Act No. 6 of 1908)**

[ *As in force on the 17th June 2016* ]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

**२०१६**

[ **किंमत :** रुपये २०.०० ]

**प्राक्कथन**

या आवृत्तीत, दिनांक १७ जून २०१६ रोजी यथाविद्यमान असलेला दि एक्सप्लोजिव सबस्टन्सेस ॲक्ट, १९०८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १७, अंक २, दिनांक २२ सप्टेंबर २०१६ यात पृष्ठे ८ ते ९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ सप्टेंबर २०१६.

**डॉ. जी. नारायण राजू,**
सचिव, भारत सरकार.

PREFACE

This edition of the Explosive Substances Act, 1908 as on the 17th June 2016 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazettee of India,* Extraordinary, Part XII, Section I, Vol. 17, No. 2, dated 22nd September 2016 on pages 8 to 9.

This authoritative text was published under the authority of the President under Section A 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 22nd September 2016.

DR. G. NARAYAN RAJU,
Secretary to the Government of India.

(शा.म.मु.) एच ४०१७ (१,०६८—१२-२०१६)

# स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रयुक्ती.

२. व्याख्या.

३. जीवितास किंवा मालमत्तेस धोका पोहोचवू शकणाऱ्या स्फोट घडवून आणण्यासाठी शिक्षा.

४. स्फोट घडवण्याचा प्रयत्न करण्यासाठी किंवा जीवितास वा मालमत्तेस धोका पोहोचवण्याच्या हेतूने स्फोटके तयार करणे किंवा बाळगणे, यासाठी शिक्षा.

५. संशयास्पद स्थितीत स्फोटके तयार करण्याबद्दल किंवा बाळगण्याबद्दल शिक्षा.

६. अपप्रेरकास शिक्षा.

७. अपराधाच्या न्यायचौकशीवरील निर्बंध.

## स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८

(१९०८ चा अधिनियम क्रमांक ६)[१]

[ १७ जून २०१६ रोजी यथाविद्यमान ]

[८ जून, १९०८]

**स्फोटक पदार्थासंबंधीच्या कायद्यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** स्फोटक पदार्थासंबंधीच्या कायद्यामध्ये आणखी सुधारणा करणे आवश्यक आहे ;

**त्याअर्थी,** याद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रयुक्ती.

**१.** (१) या अधिनियमास स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८ असे म्हणावे.

[२][(२) याची व्याप्ती संपूर्ण भारतभर असेल[३] * * * , आणि तो [४][भारताबाहेरील]भारताच्या नागरिकांना सुद्धा लागू आहे.]

व्याख्या.

[५][**२.** या अधिनियमातील,—

(क) " स्फोटक पदार्थ " या शब्दप्रयोगात, कोणताही स्फोटक पदार्थ बनवण्यास लागणारे कोणतेही साहित्य, तसेच कोणत्याही स्फोटक पदार्थांद्वारे किंवा त्याच्या मदतीने स्फोट घडवून आणण्यासाठी किंवा घडवून आणण्यात साहाय्य करण्यासाठी वापरलेले, किंवा वापरण्याचे योजिलेले किंवा जुळविलेले कोणतेही उपकरण संच, यंत्र, अवजार किंवा साहित्य, तसेच अशा कोणत्याही उपकरण संचाचा, यंत्राचा किंवा अवजाराचा कोणताही भाग; याचा समावेश असल्याचे समजण्यात येईल ;

(ख) " विशेष प्रवर्गातील स्फोटक पदार्थ " या शब्दप्रयोगात, रिसर्च डेव्हलपमेंट एक्सप्लोजिव (आरडीएक्स), पेन्टा एरीथ्रीटॉल टेट्रा नायट्रेट (पीईटीएन), हाय मेल्टिंग एक्सप्लोजिव (एचएमएक्स), ट्राय नायट्रो टोल्युएन (टीएनटी), लो टेंपरेचर प्लास्टिक एक्सप्लोजिव (एलटीपीई), कंपोझीशन एक्सप्लोडिंग (सीई), (२,४,६ फिनेल मिथेल नायट्रामीन किंवा टेट्रील), ओसीटीओएल (हाय मेल्टिंग एक्सप्लोजिव आणि ट्राय नायट्रो टोल्युएन यांचे मिश्रण), प्लास्टिक एक्सप्लोजिव खडकी-१ (पीईके-१) आणि आरडीएक्स/ टीएनटी संयुगे आणि त्याच प्रकारची इतर स्फोटके आणि त्यांचा संयोग आणि स्फोट घडवून आणणारी रिमोट कंट्रोल साधने आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ केंद्र सरकारने अधिसूचनेद्वारे **राजपत्रात** विनिर्दिष्ट केलेले कोणतेही इतर पदार्थ आणि त्यांचा संयोग, यांचा समावेश असल्याचे समजण्यात येईल.

जीवितास किंवा मालमत्तेस धोका पोहोचवू शकणाऱ्या स्फोट घडवून आणण्यासाठी शिक्षा.

**३.** जी कोणतीही व्यक्ती बेकायदेशीरपणे आणि विद्वेषाने,—

(क) कोणत्याही स्फोटक पदार्थाने, जीवितास धोका निर्माण होऊ शकेल किंवा मालमत्तेस गंभीर हानी पोहोचू शकेल अशा प्रकारचा स्फोट घडवून आणील मग, प्रत्यक्षात त्यामुळे व्यक्तीला किंवा मालमत्तेला कोणतीही इजा पोहचलेली असो वा नसो तिला आजीव कारावासाची किंवा, दहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी, कोणत्याही एका स्वरूपाच्या सश्रम कारावासाची शिक्षा होईल आणि ती द्रव्यदंडासही पात्र होईल ;

(ख) विशेष प्रवर्गातील कोणत्याही स्फोटक पदार्थाने जीवितास धोका निर्माण होऊ शकेल किंवा मालमत्तेला गंभीर हानी पोहोचू शकेल अशा प्रकारचा स्फोट घडवून आणील मग-प्रत्यक्षात त्यामुळे व्यक्तीला किंवा मालमत्तेला कोणतीही इजा पोहचलेली असो व नसो–तिला, मृत्युदंडाची, किंवा आजीव सश्रम कारावासाची शिक्षा होईल, आणि ती द्रव्यदंडासही पात्र होईल.

---

१. या अधिनियमाचा विस्तार गोवा, दमण आणि दीव येथे १९६२ चा विनियम १२, याच्या कलम ३ व अनुसूची यांद्वारे, फेरबदलांसह करण्यात आला, आणि पाँडिचेरी येथे १९६३ चा विनियम ७ याचे कलम ३ व अनुसूची एक अन्वये अंमलात आला आहे. (१ ऑक्टोबर १९६३ रोजी व तेव्हापासून) ; आणि दादरा व नगर हवेली येथे, १९६३ चा विनियम ६, याचे कलम २ व अनुसूची एक यांद्वारे (१ जुलै १९६५ रोजी व तेव्हापासून) ; लक्षद्वीपचे संपूर्ण संघ राज्यक्षेत्र येथे १९६५ चा विनियम ८, कलम २ व अनुसूची यांद्वारे (१ ऑक्टोबर १९६७ रोजी व तेव्हापासून) ; सिक्कीम राज्यात अधिसूचना क्र. जी.एस.आर. २०१, दिनांक ३० जानेवारी १९७६ (१ फेब्रुवारी १९७६ रोजी व तेव्हापासून) ; अंमलात आला आहे.

२. अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ पोटकलमाऐवजी दाखल करण्यात आले.

३. सन १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे " भाग ख मधील राज्या व्यतिरिक्त " हे शब्द निरसित करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे " जेथे जेथे ते असतील " या ऐवजी दाखल करण्यात आले.

५. सन २००१ चा अधिनियम ५४, कलम २ अन्वये कलमे २ ते ५ ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**४.** जी कोणतीही व्यक्ती, बेकायदेशीरपणे किंवा विद्वेषाने,— (स्फोट घडवण्याचा प्रयत्न करण्यासाठी किंवा जीवितास वा मालमत्तेस धोका पोहचवण्याच्या हेतूने स्फोटके तयार करणे किंवा बाळगणे, यासाठी शिक्षा.)

(क) स्फोटक पदार्थाने किंवा विशेष प्रवर्गातील स्फोटक पदार्थाने जीवितास धोका निर्माण होऊ शकेल किंवा मालमत्तेला गंभीर हानी पोहोचू शकेल अशा प्रकारचा स्फोट घडवून आणण्याच्या हेतूने कोणतीही कृती करील किंवा स्फोटक पदार्थाने किंवा विशेष प्रवर्गातील स्फोटक पदार्थाने असा स्फोट घडवून आणण्याचा कट रचील ; किंवा

(ख) जीवितास धोका निर्माण करण्याच्या किंवा मालमत्तेला गंभीर हानी पोहचवण्याच्या हेतूने, किंवा त्याच्या योगाने भारतातील जीवित संकटात घालण्यास किंवा मालमत्तेस गंभीर हानी पोहचवण्यास इतर कोणत्याही व्यक्तीस, सक्षम करण्याच्या हेतूने कोणतेही स्फोटक पदार्थ किंवा विशेष प्रवर्गातील स्फोटक पदार्थ तयार करील किंवा ते स्वतःजवळ बाळगील किंवा स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवील,

तिला, असा कोणताही स्फोट झाला वा न झाला तरी, आणि एखाद्या व्यक्तीस किंवा मालमत्तेची प्रत्यक्षात हानी झाली वा न झाली तरी,—

(एक) कोणत्याही स्फोटक पदार्थाच्या बाबतीत, आजीव कारावासाची किंवा दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतकी, कोणत्याही एका स्वरूपाच्या कारावासाची शिक्षा होईल, आणि ती द्रव्यदंडासही पात्र असेल ;

(दोन) विशेष प्रवर्गातील स्फोटकांच्या बाबतीत, आजीव सश्रम कारावासाची किंवा दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल आणि ती द्रव्यदंडासही पात्र असेल.

**५.** जी कोणतीही व्यक्ती, कोणताही स्फोटक पदार्थ किंवा विशेष प्रवर्गातील स्फोटक पदार्थ, ती तो कायदेशीर उद्देशासाठी तयार करीत नाही किंवा स्वतःजवळ बाळगीत नाही किंवा स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवीत नाही असा वाजवी संशय निर्माण होईल अशा परिस्थितीत ते तयार करील किंवा जाणीवपूर्वक स्वतःजवळ बाळगील किंवा स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवील अशा व्यक्तीला, ती स्फोटके तिने कायदेशीर उद्देशाने तयार केली किंवा बाळगली किंवा स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवली असल्याचे दाखविता आले नाही तर तिला,— (संशयास्पद स्थितीत स्फोटके तयार करण्याबद्दल किंवा बाळगण्याबद्दल शिक्षा.)

(क) कोणत्याही स्फोटक पदार्थाच्या बाबतीत, दहा वर्षांपर्यंत असू शकेल, इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि ती द्रव्यदंडासही पात्र असेल ;

(ख) कोणत्याही विशेष प्रवर्गातील स्फोटक पदार्थाच्या बाबतीत, आजीव सश्रम कारावासाची शिक्षा, किंवा दहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची सश्रम कारावासाची शिक्षा होईल, आणि ती द्रव्यदंडासही पात्र असेल.]

**६.** जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये कोणत्याही अपराधासाठी पैशाचा पुरवठा करून, किंवा याचना करून, जागा उपलब्ध करून देऊन, साहित्याचा पुरवठा करून, किंवा कोणत्याही रीतीने या अधिनियमाखालील कोणताही गुन्हा घडवून आणील किंवा ते साध्य करील किंवा त्यासाठी, समुपदेशन करील, साहाय्य करील, अपप्रेरणा देईल, किंवा सहायक होईल, अशा व्यक्तीस, त्या अपराधासाठी तरतूद केलेली शिक्षा देण्यात येईल. (अपप्रेरकास शिक्षा.)

**७.** कोणतेही न्यायालय, संबंधित [१][* * *] [२][जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या] संमतीने असेल त्याव्यतिरिक्त अन्य बाबतीत, कोणत्याही व्यक्तीची, या अधिनियमाखाली घडलेल्या अपराधासाठी न्यायचौकशी करणार नाही. (अपराधाच्या न्यायचौकशीवरील निर्बंध.)

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे " स्थानिक प्रशासन " हा शब्द वगळण्यात आला.

२. सन २००१ चा अधिनियम, क्रमांक ५४ कलम ३ अन्वये वरील मजकूर दाखल करण्यात आला.

# The Explosive Substances Act, 1908

## स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८

इंग्रजी – मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| apparatus | उपकरण संच | [S.2(a)] |
| combination | संगती | [S.2(b)] |
| compound | संयुग | [S.2(b)] |
| explosion | स्फोट | [S.2(a)] |
| implement | अवजार | [S.2(a)] |
| lawful object | कायदेशीर उद्देश | [S.5] |
| machine | यंत्र | [S.2(a)] |
| solicitation | याचना | [S.6] |
| special category | विशेष प्रवर्ग | [S.2(b)] |

# स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८

# The Explosive Substances Act, 1908

मराठी – इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अवजार | implement | [ क.२(क) ] |
| उपकरण संच | apparatus | [ क.२(क) ] |
| कायदेशीर उद्देश | lawful objects | [ क. ५ ] |
| याचना | solicitation | [ क. ६ ] |
| यंत्र | machine | [ क.२(क) ] |
| विशेष प्रवर्ग | special category | [ क.२(ख) ] |
| संगती | combination | [ क.२(ख) ] |
| संयुग | compound | [ क.२(ख) ] |
| स्फोट | explosion | [ क.२(क) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई